पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/४/कावि/ ३६९ /२०२१
दिनांक : ३०/०७/२०२१

प्रति,

मा......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा दि.**०६/०८/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार** दिनांक **०६/०८/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.
मा.विधी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - १७**

**दिनांक : ०६/०८/२०२१** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार,** दिनांक **०६/०८/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवडमहानगरपालिका आस्थापनेवर **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची २४ पदे **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० - २०८७००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता ५ पदे रिक्त आहेत. **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १२/०७/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **उपअभियंता (स्था)** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० - २०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **उपअभियंता नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|
| १ | श्रीम.पाठक अनघा अविनाश | ज्येष्ठतेनुसार |
| २ | श्री.जावरानी मनोहर टेकचंद | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **उप अधिकारी** यांना **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० -२०८७००** मध्ये **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहूनसेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकरिता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट "अ"मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ प्रसिद्ध करण्यात आली होती. विशेषतज्ञ अधिका-यांची रिक्त पदे भरणेकामी उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक असल्याने ऑनलाईनद्वारे अर्ज केलेले उमेदवारांना जाहिर निवेदन, ई-मेलद्वारे कागदपत्र तपासणी व मौखिक मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते.ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी मौखिक मुलाखतीस उपस्थित राहीलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडील संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी व मौखिक मुलाखती दिनांक १८/०९/२०२० रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

१) नामनिर्देशनाव्दारे अर्ज मागविण्याची पध्दती :- www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने

२) विशेषतज्ञ पदांची वेतनश्रेणी :- अ.क्र.०१ ते ०३ वर नमूद पदांना र.रु.१५६००-३९१०० अँके.ग्रेड पे रु. ७६०० अ.क्र.०४ ते ११ वर नमूद पदांना र.रु.१५६००-३९१०० अँके.ग्रेड पे रु.६६०० (सहाव्या वेतन योगानुसार)

३) नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल, उमेदवाराचे नाव, नेमणूक प्रवर्ग :- सोबतचे परिशिष्ठ "अ"नुसार

निवड समितीने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेतल्या असून मुलाखती दरम्यान जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे.अनुभव, विषयातील ज्ञान इत्यादीनुसार उमेदवारांना गुण देण्यात आलेले आहेत. सदर गुण तक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र 'अ'नुसार पात्र उमेदवारांची निवड यादी सादर केली आहे. त्या यादीमधील विशेषतज्ञ अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता मिळणेकामी महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपलिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३६९ /२०२१
दिनांक : ३०/०७/२०२१ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी ४११ ०१८**

**प्रपत्र-अ**

| अ.क्र. | पदनाम | उमेदवाराचे नाव | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | युरो सर्जन | डॉ.कुडलिकर उपेंद्र माधवराव | खुला |
| २ | नेफ्रोलॉजिस्ट | डॉ.बिराजदार निरज बसवराज | खुला |
| ३ | ऑन्को सर्जन | डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद | खुला |
| ४ | निवासी वैद्यकीय अधिकारी | डॉ.पवार मनिष नामदेव | खुला (वि.जा.(अ)) |
| ५ | अनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ) | डॉ.विधाटे वैशाली बबनराव | इतरमागासवर्ग |
| ६ | क्ष किरण शास्त्रज्ञ | डॉ.भिरुड हेमंत चंद्रकांत | इतरमागासवर्ग |
| ७ | सर्जन | डॉ.निकम राहूल मधुकर | अनुसूचित जाती |
| ८ | फिजिशियन | डॉ.सरदे कपिल सखाराम | इतरमागासवर्ग |
| ९ | बालरोग तज्ञ | डॉ.सोनी सिमा प्रविण | खुला |
| १० | अस्थिरोग तज्ञ | डॉ.पाटोळे विवेक विश्वनाथ | अनुसूचित जाती |
| ११ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | डॉ.नितनवरे गुंजन सुरेंद्र | खुला (अनु.जाती) |

सही/-

अतिरिक्त आयुक्त (१)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-४११०१८